



माथेरान मध्ये प्रदुषण...
घोडे जबाबदार... पान २

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२४ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## विमाननगरमध्ये स्पा सेंटरवर पोलिसांची रेड खिडकीतून उडी मारल्याने महिलेचा मृत्यू



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२३, पुणे :** विमाननगर परिसरात धक्कादायक घटना घडली असून प्राथमिक माहितीनुसार येथील चंदननगर पोलीस ठाणे सोमर विमान नगर पोलीस ठाणे (हद्दीत) विमान नगर पोलीस पथकाने अचानक एका स्पा वर छापा टाकला. या कारवाई दरम्यान घडलेल्या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी संशयित हालचालींच्या पार्श्वभूमीवर स्पा सेंटरवर रेड केली. कारवाई सुरू होताच आत उपस्थित काही जणांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. याच वेळी एका महिलेने आणि स्पा सेंटरच्या मॅनेजरने घाबरून थेट खिडकीतून उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली.

या घटनेत संबंधित महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे, तर स्पा मॅनेजर गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

घटनेनंतर पोलिसांनी परिसर सील करून पुढील तपास सुरू केला आहे. स्पा सेंटरमध्ये नेमकी कोणती बेकायदेशीर कृत्ये सुरू होती का, याबाबतही चौकशी केली जात आहे. तसेच मृत महिलेची ओळख पटविण्याचे काम सुरू असून संबंधित प्रकरणात अधिकृत माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे विमाननगर परिसरात भीती आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# नांदेडमध्ये अवकाळीचा हाहाकार
## तोंडाशी आलेला घास हिरावला, बळीराजाची चिंता वाढली!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नांदेड :** नांदेड जिल्हा परिसरात गेल्या दोन दिवसांपासून निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळत असून, हवामान विभागाने वर्तविलेला अंदाज खरा ठरला आहे. किनवट तालुक्यात आज सायंकाळी ढगांच्या गडगडाटासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अवकाळी संकटामुळे हाताशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली असून, संपूर्ण जिल्ह्यातील शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

**रब्बी पिके संकटात !**

रविवारी रात्री १० वाजताही पावसाने तडाखा दिला होता. त्यानंतप पावसाने सोमवारीही सायंकाळी ४ वाजता अधिक जोरासह परत हजेरी लावली. सध्या किनवट तालुक्यात हरभरा काढणीचा हंगाम ऐन जोमात आहे, तर गहू, ज्वारी आणि मका ही पिके अंतिम टप्प्यात आहेत. अशा



वेळी झालेल्या पावसामुळे उभ्या पिकांचे नुकसान होण्यासोबतच, शेतात कापून ठेवलेला हरभरा भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दरम्यान, आता २३ ते २५ फेब्रुवारी दरम्यान काही भागात गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकला आहे.

**कृषी विभागाने दिला इशारा !**

गारपीट झाल्यास हरभऱ्याचे घाटे झडण्याची आणि ओलाव्यामुळे गव्हाचे दाणे काळवंडण्याची शक्यता आहे. वाढीच्या टप्प्यातील मका पिकात पाणी साचल्यास खोड आडवे पडणे आणि पिकांवरील बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. आधीच उत्पादन खर्च वाढलेला असताना आता निसर्गाच्या कोपामुळे पिकांच्या गुणवत्तेवर आणि उत्पादनावर परिणाम होणार हे निश्चित मानले जात आहे.

**प्रशासनाचे आवाहन...**

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. काढलेला शेतमाल सुरक्षित स्थळी हलविणे, ताडपत्रीचा वापर करणे आणि तातडीने काढणी पूर्ण करणे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, समाजमाध्यमांवरील कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत हवामान अंदाजाचे पालन करण्याचे सुचविले आहे.

वाढलेली आर्द्रता आणि तापम ानातील चढ-उतार यामुळे हवामान अजूनही अस्थिर आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी आता किनवट तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यातून जोर धरत आहे.

## अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान !

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**



**दि.२३, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान झाले आहे. त्यात सोसाट्याच्या वाऱ्यामुळे ज्वारी, गहू, हरभरा आदी पिके जमीनदोस्त झाली आहेत.

रब्बी पिके काढणीला आली आहेत. बऱ्याच ठिकाणी तुर, ज्वारी, हरभरा, गहू आदी पिकांचे खळे केली जात आहेत. त्यासह उभ्या पिकाला सोमवारी मोठा फटका बसला आहे. रविवार पासून ढगाळ वातावरण होते, वातावरणात बदलही झाला होता. सोमवारी दुपारी त्याचा परिणाम दिसून आला. अचानक आभाळ भरून आले आणि सोसाट्याच्या वाराही सुटला, त्यामुळे उभी पिके आडवी पडली. कित्येक शेतात तुरीचे, हरभऱ्याचे वाळलेले घाटे जमिनीवर गळून पडले. गव्हाच्या ठुशीत पाणी शिरल्याने या पिकाचेही मोठे नुकसान झाले.हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तालुक्यात प्रामुख्याने आनंदवाडी, चाटोरी, बोरगाव, बंदरवाडी, खडी, नाव्हा, नाव्हलगांव, कांदलगाव, पालम, केरवाडी, सह संपूर्ण तालुक्यात पिकांना मोठा फटका बसला आहे.

## उगावच्या तरुणाचा परसूल शिवारात संशयास्पद मृत्यू ! हात-पाय बांधून मृतदेह पाण्यात फेकला!

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३३, विंचूर (नाशिक) :** चांदवड-निफाड म ार्गावरील परसुल चिंचोली नदीच्या पुलाखाली एका ३० वर्षीय तरुणाचा संशयास्पद अवस्थेत मृतदेह आढळल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. शादाब रज्जाक तांबोळी (वय ३०, रा. उगाव) असे मृताचे नाव असून, त्याची हत्या करून मृतदेह पुलाखाली फेकला असल्याचा दाट संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेच्या निषेधार्थ आणि सखोल चौकशीच्या मागणीसाठी आज निफाड येथे मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला.

**नेमकी घटना काय?**

शादाब तांबोळी हे १८ फेब्रुवारी २०२६ पासून बेपत्ता होते, त्याबाबत निफाड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली होती. मात्र, रविवारी (दि. २२) सकाळी ९ वाजेच्या सुमारास परसुल शिवारातील पुलाखाली स्थानिक नागरिकांना एक मृतदेह तरंगताना दिसला. चांदवड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला असता, अंगावर शहारा आणणारी दृश्ये समोर आली.

**क्रूरतेचा कळस : डंबेल्स बांधून फेकला मृतदेह...**

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक पाहणीत घातपाताचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

मृताचे दोन्ही हात नायलॉन दोरीने मांडीला घट्ट बांधलेले होते. कमरेला साधारण २० ते ३० किलो वजनाचे डंबेल्स बांधले होते, जेणेकरून मृतदेह पाण्यावर तरंगू नये. तोंड कपड्याने घट्ट आवळलेले होते.

**निफाडमध्ये जनक्षोभ : मोर्चाने वेधले लक्ष...**

शादाबचा मृत्यू ही आत्महत्या नसून पूर्वनियोजित खून असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या प्रकरणाचा तपास जलद गतीने व्हावा आणि आरोपींना तात्काळ बेड्या ठोकल्या जाव्यात, या मागणीसाठी आज (दि.२३) निफाडमध्ये भव्य मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना निवेदन देऊन संताप व्यक्त केला.

ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि क्रूर आहे. पोलिसांनी सर्व तांत्रिक पुरावे गोळा केले असून, चांदवड व निफाड पोलीस संयुक्तपणे तपास करत आहेत. दोषींना



कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. पोलीस प्रशासन

सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता असून, पोलीस सीसीटीव्ही फुटेज आणि शादाबच्या मोबाईल कॉल रेकॉर्डच्या आधारे तपास करत आहेत. उगाव परिसरात या घटनेमुळे शोककळा पसरली असून सर्वांचे लक्ष आता पोलीस तपासाकडे लागले आहे.

## वासुंद्यातील नानकर मळा-दावलमलिक रस्त्याचे भूमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** वासुंदे गावातील नानकर मळा ते दावलम लिक रस्त्याचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले.

या रस्त्याच्या विकासामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. पूर्वी शेतकऱ्यांना अवजार, ट्रॅक्टर व पिकाची ने-आण करताना अडचणी येत होत्या. आता हा रस्ता सुधारित होत असल्याने शेतमालाची वाहतूक सोपी होईल. रस्त्याचे रुंदीकरण करून पक्का रस्ता झाल्यास वाहतूक सुरळीत होईल. अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली. वासुंदे परिसरात गेल्या काही काळात स्थानिक अनेक रस्त्यांचे प्रश्न सुजित झावरे पाटील यांच्यामुळे मार्गी लागले आहेत.

यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांच्यासह स्थानिक नेत्यांचे आभार मानले. हा रस्त्यामुळे ग्रामीण भागाच्या प्रगतीला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी गुरुदत्त पतसंस्था चेअरमन बा. ठ. झावरे, जेष्ठ नेते भागूजी झावरे, माजी उपसरपंच शंकर बर्वे, शरद पाटील, रणजित पाटील, सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, चेअरमन सूर्यभान भालेकर, व्हा. चेअरमन लक्ष्मण झावरे, विलास साठे, पो. मा. झावरे, रामदास झावरे,भाऊसाहेब सैद, बाळासाहेब झावरे, लहानू झावरे, रा. बा. झावरे, इंजि. निकील दाते, दिलीप पाटोळे, सोन्याबापू बर्वे, बी एम झावरे सर, सुभाष शिंदे, श्रीकांत साळुंके, मारुती उगले, शांताराम झावरे, शिवाजी झावरे,निवृत्ती बर्वे, संपत झावरे, भिकाजी झावरे, पा. ल. बर्वे, सुभाष राऊत, अंकुश झावरे, स्वप्नील झावरे, संभाजी झावरे, डॉ. प्रसाद झावरे, निवृत्ती झावरे, ओंकार झावरे, संदीप झावरे, अक्षय झावरे, आदी यावेळी उपस्थित होते.



> वासुंदे येथील स्थानिक रस्त्यांचा प्रश्न सुजित झावरे पाटील यांच्यामुळे मार्गी लागत आहे. त्यामुळे स्थानिक वाहतूक सोपी झाली असून शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. रस्त्यांमुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाला चालना मिळत आहे. यापुढेही असेच प्रश्न मार्गी लावून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय द्यावा.
>
> **- बा.ठ.झावरे**
> **(चेअरमन, गुरुदत्त पतसंस्था)**

## 'क्राइस्ट इंटरनॅशनल स्कूल'मध्ये ३०-३२ विद्यार्थ्यांना बेदम मारहाण

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२३, उदगीर (लातुर) :** लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुका हा 'शिक्षणाची पंढरी' म्हणून ओळखला जातो. मात्र, याच पंढरीला आणि पवित्र अशा शिक्षकी पेशाला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना 'क्राइस्ट इंटरनॅशनल स्कूल' थोरलेवाडी येथे घडली आहे. हॉस्टेलमधील तब्बल ३० ते ३२ चिमुकल्या विद्यार्थ्यांना वेळूच्या काठीने बेदम मारहाण करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

पोलीस प्रशासनाकडून मि ळालेल्या माहितीनुसार, २१ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजेच्या सुम ारास क्राइस्ट इंटरनॅशनल स्कूलच्या हॉस्टेलमध्ये हा प्रकार घडला. आरोपी उज्वल प्रकाश सोनी (रा.बैतुल, मध्य प्रदेश) याला आपल्या मोटारसायकलचे नुकसान हॉस्टेलमधील मुलांनीच केले असल्याचा संशय होता. या शुल्लक कारणावरून त्याने संयम गमावला आणि ३० ते ३२ विद्यार्थ्यांना अश्लील



शिवीगाळ करत वेळूच्या काठीने अम ानुष मारहाण केली.

विशेष म्हणजे, मारहाण करताना त्याने मी या शाळेचा प्राचार्य होणार आहे, तेव्हा तुम्हाला बघून घेतो, अशी धमकीही विद्यार्थ्यांना दिली. ज्या शिक्षकी पेशाकडे समाज मार्गदर्शक म्हणून बघतो, त्याच पदाची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तीकडून अशा प्रकारचे क्रूर कृत्य घडल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याप्रकरणी शाळेचे प्राचार्य जैबाबेरला प्रपीन नाडर (वय ४२) यांनी अहमदपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी उज्वल सोनी विरुद्ध भारतीय न्याय संहिता BNS २०२३: कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३).

बालन्याय अधिनियम २०१५: सह कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली आहे.

अहमदपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विनोद म ेत्रेवार यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक स्मिता जाधव या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. जखमी विद्यार्थ्यांनी उपचार घेतल्यानंतर ही तक्रार दाखल करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, 'शिक्षणाच्या पंढरी' त घडलेल्या या घटनेमुळे सर्वच स्तरातून निषेध व्यक्त होत आहे.

# बांगलादेशातील सत्तांतर



भारताचा शेजारी असलेल्या बांग्लादेशात जुलै २०२४ मध्ये झालेल्या उठावानंतर पहिल्यांदाच निवडणुका झाल्या. बांग्लादेशात झालेल्या या निवडणुकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते त्यातही या निवडणुकीकडे भारताचे विशेष लक्ष होते कारण बांगलादेश हा भारताचा शेजारी देश आहे. या देशाच्या सीमा भारताला लागून आहेत. या देशात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडी भारतावर परिमाण करणाऱ्या आहेत. या देशात कोणते सरकार येणार यावर दोन्ही देशाचे संबंध कसे राहणार हे अवलंबून असणार असल्याने या निवडणुकीकडे केवळ भारत सरकारचेच नव्हे तर भारतीय जनतेचेही लक्ष लागून राहिले होते. जुलै २०२४ पूर्वी बांग्लादेशात अस्तित्वात असलेल्या शेख हसिना वाजेद यांच्या सरकारचे आणि भारताचे सौहार्दाचे संबंध होते. शेख हसिना या भारताला सच्चा मित्र मानत होत्या त्यामुळेच त्यांना पदच्युत करून आपल्या विचाराचे सरकार तिथे आणून भारताला त्रास देण्याचे षडयंत्र पाकिस्तान आणि चीनने आखले त्यात ते यशस्वीही झाले. त्यांनी बांगलादेशातील कट्टर पंथीयांना हाताशी धरून शेख हसिना यांच्या विरोधात मोठा उठाव केला. शेख हसिना यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. आपला जीव वाचवण्यासाठी त्यांनी भारतात आश्रय घेतला. पाकिस्तान आणि चीनचे मनसुबे सफल झाले. शेख हसिना यांच्या जागेवर त्यांनी मोहम्मद युनस यांना बसवले. मोहम्मद युनूस यांनी त्यांच्या दीड वर्षाच्या कालावधीत भारताशी जितका पंगा घेता येईल तितका घेतला. याच दरम्यान त्यांनी बांगलादेशातील हिंदूंवर जुलूम करत त्यांना प्रचंड त्रास दिला. हजारो हिंदूंच्या कत्तली केल्या. हिंदूंची मंदिरे घरे पाडण्यात आली. एकप्रकारे मोहम्मद युनूस यांची दीड वर्षाची कारकीर्द भारतासाठी डोकेदुखी ठरली. भारत आणि बांगलादेश यांच्यातील संघर्ष वाढवण्याचे काम मोहम्मद युनूस यांनी केलं. त्यामुळे ते जितक्या लवकर सत्तेबाहेर जातील तितक्या लवकर भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध पूर्ववत होतील असे वाटत होते पण मोहम्मद युनूस गेले तरी भारत बांगलादेश संबंध पूर्ववत होतील असे वाटत नाही कारण त्यांच्या जागी आलेले तारिक रहमान यांचे भारताविषयीचे मत सकारात्मक नाही. अर्थात या निवडणुकीत तेच जिंकून येणार हे सांगायला कोणा तज्ज्ञांची गरज नव्हती कारण निवडणूक जाहीर होताच बांगलादेशच्या निवडणूक आयोगाने शेख हसिना यांच्या अवामी लीग या पक्षावर निवडणूक लढवण्यास बंदी घातली. अवामी लीग शर्यतीत नसल्याने तारिक रहमान यांच्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी ( बीएनपी ) पक्षाने ३०० पैकी तब्बल २१२ जागा जिंकल्या. त्यांचे प्रतिस्पर्धी असलेले जमाते इस्लामी आणि नॅशनल सिटीझन्स पार्टीला नगण्य जागा मिळाल्या. तारिक रहमान हे बांगलादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदा जिया यांचे सुपुत्र आहेत. गेल्या सतरा वर्षापासून त्यांचे वास्तव्य अमेरिकेत होते. त्यांच्या मातोश्री बेगम खालिदा झिया या तुरुंगात होत्या. शेख हसिना यांचे सरकार पाडल्यावर मोहम्मद युनूस यांना त्यांना तुरुंगातून बाहेर काढले. याच दरम्यान तारिक रहमान अमेरिकेतून बांग्लादेशात आले. तुरुंगातून बाहेर येताच बेगम खालिदा झिया यांचे निधन झाले. त्याची सहानुभूती तारिक रहमान यांना मिळाली शिवाय त्यांचाच पक्ष सत्तेवर यावा यासाठी तेथील सर्व यंत्रणा कामाला लागली होती. या साऱ्याचा परिपाक म्हणजेच तारिक रहमान यांचा हा मोठा विजय. अर्थात विरोधात कोणीच नसल्याने त्यांचा विजय ठरलेलाच होता. आता ते बांगलादेशचे पंतप्रधान बनले आहेत. त्यांच्या कारकिर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यातील बिघडलेले संबंध पूर्ववत होतील अशी अपेक्षा आहे पण ही अपेक्षा पूर्ण होईलच असे ठामपणे सांगता येत नाही कारण तारिक रहमान यांच्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे भारताबाबतचे मत नकारात्मक असेच आहे. त्यांचा पक्ष हा पूर्वीपासून पाकिस्तान आणि चीन धार्जिणा आहे त्यामुळेच तारिक रहमान देखील मोहम्मद युनूस यांच्याप्रमाणेच पाकिस्तान आणि चीनच्या हातचे बाहुले बनतील असे वाटते. अर्थात बांगलादेशशी भारताचे संबंध मैत्रीपूर्णच असावेत असाच प्रयत्न भारताचा राहील. अर्थात या प्रयत्नांना तारिक रहमान कसा प्रतिसाद देतात यावरच सारे अवलंबून आहे.

# प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आहे का ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

काही दिवसांवर येणाऱ्या होळी आणि धुलिवंदनची धूम बच्चे कंपनीमध्ये आतापासूनच सुरु झाली आहे. होळीनिमित्त पाण्याने भरायचे फुगे आता दुर्मिळ झाल्याने गेल्या काही वर्षांपासून मुलांकडून जाडीने अत्यंत पातळ असणाऱ्या पिशव्यांचा फुग्यांप्रमाणे वापर केला जात आहे. दरवर्षी होळीच्या अनुषंगाने अशा पातळ पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या पिशव्या फुटल्यावर त्यांचे तुकडे आहे तिथेच पडून राहतात. होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी रस्त्यांवर या पिशव्यांचा अक्षरशः खच पडलेला पाहायला मिळतो. याच पिशव्या हवेमुळे जवळच्या गटारांत आणि नाल्यांत जातात आणि पुढे जे व्हायचे तेच होते. दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात या पिशव्या येतात कुठून हा प्रश्न त्यावेळी सर्वांनाच पडतो. प्लास्टिक पिशव्यांविरुद्धच्या मोहिमेअंतर्गत सरकारी कर्मचारी विक्रेत्यांवर कारवाई करतात; मात्र या कमी जाडीच्या पिशव्या ज्या ठिकाणी तयार केल्या जातात त्या कारखान्यांवर किंवा त्यांच्या घाऊक व्यापाऱ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांकडून कारवाई केली गेल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. त्यामुळे प्लास्टिक पिशव्यांविरुद्ध सरकारची अधूनमधून उघडली जाणारी मोहीम ही पर्यावरणाच्या रक्षणासाठी असते की केवळ दंडवसुलीतून महसूल मिळवण्यासाठी असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडल्यावाचून राहत नाही. २६ जुलै २००५ या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाने साऱ्या मुंबईची तुंबई करून टाकली.



मुंबई नगरीत आलेल्या या महापुराने शेकडों निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अनेकांच्या घरात पाणी शिरून कोट्यवधी रुपयांची वित्तीय हानी झाली. या महाप्रलयामागील कारणमीमांसा तपासताना अतिक्रमणामुळे मिठी नदीचे अरुंद होत चाललेले पात्र, नाल्यांच्या साफसफाईतील अनियमितता, स्थानिक लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपणा यासांसारख्या अनेक गोष्टींवर चर्चा झाली. नाल्यांचा साफसफाईतील मोठा अडसर असतो तो प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा. या प्लास्टिक पिशव्या गटारांच्या जाळ्या निकामी करतात. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पातळ पिशव्यांचा पुनर्वापर शक्य होत नाही. गटारांच्या जाळ्यांना असे पातळ प्लास्टिक चिकटल्यास पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी बराच काळ बाहेर तुंबून राहते. जमिनीच्या तळाशी प्लास्टिक चिकटून राहिल्यास पाण्याचे नैसर्गिक स्रोत बंद होतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अन्न शोधताना बऱ्याचदा प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात ज्यामुळे त्यांचा जीवही जातो. पातळ प्लॅस्टिक पिशव्यांच्या संदर्भात नैसर्गिकरित्या कुजण्याची किंवा नष्ट होण्याची प्रक्रिया होत नसल्याने वर्षोनुवर्षे या पिशव्या तग धरून राहतात त्यामुळे अशा पातळ पिशव्यांवर बंदी घालणेच इष्ट असल्याचे लक्षात येऊन राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर कायद्याने बंदी घालण्यात आली. बंदी येताच सरकारच्या वतीने भरारी पथकांची नेमणूक करून प्लास्टिक पिशव्यांचे स्रोत असलेल्या किराणा मालाच्या, फळांच्या, भाज्यांच्या दुकानांवर धाडी टाकून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आल्या आणि त्या देणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली ज्यामधून सरकार दरबारी लाखोंचा महसूल गोळा झाला. सरकारच्या अन्य मोहिमांप्रमाणे ही मोहीमही काही दिवसांनी थंड पडली, पातळ पिशव्या पुन्हा बाजारांत भाजी, फळे, मासे विक्रत्यांकडे दिसू लागल्या. कालांतराने कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करून, सरकार दरबारी निवेदने देऊन किंवा विरोधी पक्षाच्या निदर्शनास आणून देऊन राज्यात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचे कसे तीनतेरा वाजले आहेत ही बाब निदर्शनास आणून देते आणि पुन्हा एकदा सरकार खडबडून जागे होते. पुन्हा नव्याने कारवाईला सुरुवात होते. २००५ सालापासून आजतागायत प्लास्टिक पिशव्यांसह समस्त प्लास्टिक वस्तूंवर ६-७ वेळा बंदीची मोहीम उघडण्यात आली असून सहाही वेळा ही मोहीम काही कालावधी चालल्यानंतर पुन्हा बंद पडली आहे. १ जुलै २०२२ पासून राज्यात प्लास्टिक(काही अपवाद वगळता) आणि थर्माकोल यांवर कायमस्वरूपी बंदी आणण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी प्लास्टीकचा 'प' सुद्धा माहित नसणाऱ्या जगाला आज प्लास्टिकशिवाय जगणेही कठीण वाटू लागले आहे, त्यामुळे प्लास्टिकवरील बंदी यशस्वी होईल का याविषयी त्यावेळीच लोकांच्या मनात संभ्रम होता. सरकारच्या वतीने प्लॅस्टिकच्या सर्व वस्तूंना पर्यायही सुचवण्यात आले होते. त्या दरम्यान कापडी पिशव्यांना भलतेच महत्व प्राप्त झाले होते. पानाच्या टपऱ्यांपासून, वर्तमान पत्र विक्रेत्यांपासून ते हार्डवेअरच्या दुकानानांपर्यंत सर्वत्र कापडी पिशव्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे चित्र त्यावेळी पाहायला मिळत होते. ही मोहीमसुद्धा अपेक्षेप्रमाणे काही काळानंतर थंडावली. आजमितीला किराणा मालाचे दुकान, भाजीविक्रेता, फळ विक्रेता, मांस मटण विक्रेता, कापड विक्रेता, भांडी विक्रेता आदी सर्वांकडे प्लास्टिकच्या पातळ पिशव्या ग्राहकांना ना मागताही मिळू लागल्या आहेत. ट्रेन आणि एसटीमध्ये येणारे खाद्यपदार्थ आणि भाजी-फळ विक्रेतेही १०-१५ रुपयांच्या खरेदीवर या पातळ पिशव्या सहजपणे लोकांना बहाल करू लागले आहेत.

प्लास्टिक पिशव्यांविरुद्धची मोहीम यशस्वी करण्यासाठी विक्रेते आणि ग्राहक यांचे सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. ग्राहक सोबत कापडी पिशव्या बाळगत नसल्याने लहान सहन वस्तूंच्या खरेदीनंतरही विक्रेत्यांकडून पिशवीची मागणी करतात. ग्राहक नाराज होऊन अन्य दुकानांत खरेदीसाठी जाऊ नये म्हणून विक्रेतेही ग्राहकांना देण्यास परवडतील अशा हलक्या दर्जाच्या आणि कमी जाडीच्या पिशव्या दुकानांत ठेवतात. ग्राहकांची मागणी आणि विक्रेत्यांचा नाईलाज यामुळे प्लास्टिक पिशव्यांना सध्यातरी बाजारात मरण नाही. गरज आणि पुरवठा या समांतर चालणाऱ्या बाबी असून गरज घटली किंवा नष्ट झाली कि पुरवठाही आपसूकच थांबतो या न्यायाने प्लॅस्टिकच्या पिशव्यांची जनमानसांत निर्माण झालेली गरज आज थांबवली गेली पाहिजे. पर्यावरणाचा समतोल ढासळण्यास कारणीभूत असणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याच्या दृष्टीने व्यापक जनप्रबोधन काळाची गरज असून त्यासाठी संबंधित सरकारी खात्यांसह सेवाभावी, सामाजिक आणि निसर्गप्रेमी संस्थांनी पुढाकार घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे अन्यथा येणाऱ्या काळात २६ जुलैपेक्षा मोठा प्रलय पाहावा लागेल.

## अडवणूक

उचित समितीवरती
करुन टाक नेमणूक
आपसूक कमी होते
सततची अडवणूक

सहेतुक सगळे पहा
लढवती निवडणूक
निवडणूकीच्या नंतर
दिसते सार्थकचुणूक

धावपळ फळास येई
खूपचं केली दमणूक
स्वअस्तित्व उजळायं
काढलेली मिरवणूक

सुयोग्यआसनी बसो
हवीआता करमणूक
करी जराशी नाराजी
बदलू जाय वागणूक

बंदिस्त करे पद देऊ
ना मोकळे आरणूक
सुरूहोईल साठमारी
मिळवायले खंडणूक

निधी नदी ओसंडावी
न कसली कमतणूक
चापल्य पणा लावावे
उगा ना करे घाटणूक

स्पर्धाआता खरीसुरू
ठरलेली ती नाडणूक
कुणा कुठली समिती
वरिष्ठ करती वर्णणूक

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## माथेरान मध्ये प्रदूषण... घोडे जबाबदार...

माथेरान हे थंड हवेचे ठिकाण आहे. तेथे पर्यटक फिरावयास व निसर्ग सौंदर्य पाहण्यास जातात. माथेरानमध्ये सुमारे ४६० घोडे असून ते माथेरान मधील तांबड्या मातीवरून फिरत असतात. शिवाय त्यांच्या पासून दररोज तीन टन लीद रस्त्यावरच फकली जाते. यामुळे साहजिकच प्रदूषण निर्माण होत आहे याचा परिणाम तेथील लोकांच्या आरोग्यावर होत आहे. माथेरान मध्ये मोटार वाहनावर बंदी आहे. सर्व व्यवहार घोड्यावरूनच केले जातात. माथेरान हे शहर इको सेन्सेटिव्ह झोन मध्ये असल्याने तेथे वाहनावर बंदी आहे. त्यामुळे स्थानिकांना घोड्यावर बसून करावा लागतो. याशिवाय मालाची वाहतूक सुद्धा घोड्यावरूनच केली जाते. हरित ट्रिब्युनलने दिलेल्या समितीच्या निकालानुसार माथेरान मधील रहिवाशांवर आरोग्यावर होणारा वाईट परिणाम लक्षात घेऊन तेथील घोड्याचे सर्व तबेले माथेरान परिषदेच्या हद्दीबाहेर हलविण्याचा सल्ला देण्यात आला आहे. ही बातमी नुकतीच वाचली. समितीने माथेरान मधील प्रदूषण पातळीचा अभ्यास तीन टप्प्यात केला होता. त्यात पावसाळ्या अगोदर, पावसाळ्यात व पावसाळ्याच्या नंतर अशा तीन परिस्थितीचा अभ्यास केला होता. या अभ्यासातून असा निष्कर्ष निघाला कि प्रदूषणाला घोडेच जबाबदार आहेत. एकूणच प्रदूषणाला केवळ हवा व पाणी किंवा वाहने हेच जबाबदार नसून प्राणीसुद्धा जबाबदार आहेत हे माथेरान मधील घोड्यांच्या प्रदूषावरून लक्षात येते.

**- शांताराम वाघ, पुणे**

# कर्मयोगी संत गाडगे महाराज !

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे.

१८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले.

अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या



वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर-गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली.

संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १५० वि जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ढवळपुरीत विविध विकास कामांचे भूमिपूजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ढवळपुरी येथे सव्वाकोटीहून अधिक विकासकामांचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न झाले. यावेळी आमदार काशिनाथ दाते यांच्या पुढाकारातून विविध शासकीय योजनांअंतर्गत मंजूर झालेल्या कामांना त्यांच्याच शुभहस्ते प्रारंभ करण्यात आला. मंजूर कामांमध्ये श्री दुर्गादेवी मंदिर परिसर सुशोभीकरणासाठी ४० लाख रुपये, विविध वस्तीतील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण, तांडा वस्ती सुधार योजनेतील कामे, स्मशानभूमी शेड बांधकाम व सुशोभीकरण, पाणीपुरवठा सुविधा, पेव्हर ब्लॉक बसविणे, सभामंडप बांधकाम तसेच सार्वजनिक स्वच्छता सुविधांसाठी प्रत्येकी ७ ते १५ लाख रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. विविध लेखाशिर्षांतून मंजूर झालेल्या या कामांमुळे ढवळपुरीच्या पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होणार असून गावाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे. कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, उपसरपंच बबनराव पवार सर, चेअरमन भागाजी गावडे, ग्रामपंचायत सदस्य संदीप थोरात, संतोषशेठ चौगुले, सुधाकर गावडे, पोपटराव चौधरी, गोविंद कुटे, रावसाहेब चौधरी, देवीदास फलके, लिंबाशेठ चौधरी, संतोष बुचूडे, दादा पाटील थोरात, बाबाजी चौधरी, हरीभाऊ वाळुंज, भालेराव, अजित सांगळे, शिवाजी चितळकर यांसह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार दाते भावूक होऊन म्हणाले, आज मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडविताना आदरणीय दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाची प्रकर्षाने आठवण येते. कितीही कठीण आणि असाध्य वाटणाऱ्या प्रश्नांवर दादांच्या नेतृत्वाखाली सहज मार्ग निघायचा. कोणतीही अडचण त्यांच्या ध्येयापेक्षा कधी मोठी ठरली नाही. सर्वसामान्य माणसासाठी काम करण्याची त्यांची जिद्द आणि धैर्य हेच माझ्यासारख्या कार्यकर्त्यासाठी कायम प्रेरणादायी ठरणार आहे.

विकासाची गंगा गावागावात पोहोचवणारे, शब्दांपेक्षा कृतीतून विकास घडवणारे नेतृत्व, जनतेच्या विश्वासाला न्याय देणारे विकासपुरुष, रस्ते, पाणी, शिक्षण – सर्वांगीण विकासाची दिशा, जनतेच्या स्वप्नांना आकार देणारे दूरदृष्टीचे नेतृत्व, काम बोलते आणि काम म्हणजे आमदार काशिनाथ दाते, मंजूर झालेली ही कामे ढवळपुरीच्या प्रगतीसाठी महत्त्वाची ठरणार आहे. अजितदादांच्या कार्यपद्धतीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत ढवळपुरी गावाचा विकासाचा चेहरामोहरा बदलण्याचा संकल्प पूर्णत्वास नेत आहेत.

**- वसंतराव चेडे, माजी जि.प. सदस्य**

## बांधकाम कामगारांसाठी खास कल्याणकारी योजना - सुजित झावरे पाटील

### वासुंदे येथे बांधकाम कामगारांना ३० घरगुती वस्तूंचा संच वाटप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** बांधकाम कामगार हे समाजाचे खरे शिल्पकार आहेत. त्यांच्या कष्टामुळे आपले घर, रस्ते, इमारती उभ्या राहतात. त्यांच्या कुटुंबीयांना अशा सुविधा मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाद्वारे बांधकाम कामगारांसाठी मोफत घरगुती भांडी योजना राबविली आहे. सर्व नोंदणीकृत कामगारांनी या योजनांचा लाभ घ्यावा. असे मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने वासुंदे व टाकळी ढोकेश्वर परिसरातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या कुटुंबियांना आज ३० दर्जेदार घरगुती वस्तूंचा (भांडी) संच वाटप करण्यात आला. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते लाभार्थ्यांना हे संच सुपूर्द करण्यात आले. या वस्तू संचामध्ये बांधकाम कामगारांच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या भांडी, स्वयंपाकघरातील उपकरणे आणि इतर घरगुती साहित्याचा समावेश आहे. मंडळाच्या या कल्याणकारी योजनेअंतर्गत राज्यभरातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना अशा प्रकारे मदत पुरवली जात आहे. ज्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, चेअरमन, उपाध्यक्ष, विविध ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे संचालक, मान्यवर व्यक्ती, लाभार्थी बांधकाम कामगार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त प्रभाग १८ मध्ये विशेष स्वच्छता मोहीम



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, पनवेल :** पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १८ अंतर्गत संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त आज दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सकाळी सावरकर चौक व विसर्जन घाट परिसरात महापौर नितीन पाटील यांच्या सक्रिय सहभागातून विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान सावरकर पुतळा परिसर, घाट परिसर तसेच बल्लाळेश्वर तलावाच्या आतील साचलेला कचरा काढून संपूर्ण परिसराची साफसफाई करण्यात आली. तसेच परिसर पाण्याने धुवून स्वच्छ व सुशोभित करण्यात आला. यावेळी महापौरांनी स्वच्छतेबाबतची बांधिलकी कृतीतून दाखवून देत त्यांनी उपस्थित सफाई कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. स्वच्छता काम अधिक प्रभावी, शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या उपक्रमावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक जयेश कांबळे, स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर तसेच सर्व मुकादम व सफाई कर्मचारी उपस्थित होते. संत गाडगे महाराज यांच्या स्वच्छतेच्या संदेशाला अनुसरून शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# प्राथमिक शाळांच्या वर्षभरातील एकूण सुट्ट्यांबाबत 'एक राज्य - एक सुट्टी' धोरण राबवा

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** राज्यभरातील प्राथमिक शाळांच्या वर्षभरातील एकूण सुट्ट्यांबाबत एकच धोरण अंमलबजावणी करणेबाबत निवेदन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग चे कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांनी राज्य संचालक शैक्षणिक परिषद, सचिव शालेय शिक्षण, शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक यांना पाठविलेल्या एका निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यभरात प्राथमिक शाळांच्या वर्षभरातील एकूण सुट्ट्यांबाबत राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. जिल्हानिहाय वर्षभरातील प्राथमिक शाळांच्या एकूण सुट्ट्यांबाबत विभिन्नता दिसून येत आहे.

राज्यात बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९ लागू असल्याने प्राथमिक शाळांच्या सुट्ट्याबाबत सुद्धा राज्यात एकवाक्यता दिसणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ने म्हटले आहे. परंतु अजून पर्यंत राज्यभरात प्राथमिक शाळांच्या एकूण सुट्ट्यांबाबत एकवाक्यता दिसून येत नाही. या संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ने भंडारा जिल्हा परिषद व चंद्रपूर जिल्हा परिषद चे सुट्ट्यांचे पत्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या कडे अवलोकनार्थ पाठविले आहे.

वर्षभरातील एकूण सुट्ट्यांबाबत पुढील बाबींवर लक्ष केंद्रित असते सार्वजनिक सुट्ट्या, जिल्हाधिकारी सुट्टी, मुख्याध्यापक सुट्टी, स्थानिक सुट्टी, उन्हाळी सुट्टी, दिवाळी सुट्टी असते. प्राथमिक शाळांना वर्षभरातील एकूण सुट्ट्या देत असतांनाच बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९ नुसार शालेय अध्यापन दिवस सुद्धा विचारात घेणे अत्यावश्यक आहे. प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळा यांचे अध्यापन दिवस भिन्न आहेत परंतु प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळा यांना सारखेच अध्यापन दिवस जारी होत आहे.

बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९ हा राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळांना लागू आहे. त्यानुसार राज्यातील सर्व प्राथमिक शाळांचे त्याचप्रमाणे उच्च प्राथमिक शाळांचे एकूण अध्यापन दिवस/तास त्याचप्रमाणे वर्षभरातील एकूण सुट्ट्या सारखे असणे आवश्यक आहे.

विभागीय निहाय सुट्टीत विभिन्नता, विभागातील जिल्हानिहाय सुट्टीत विभिन्नता, राज्यभरात एक शैक्षणिक धोरण, एक परिक्षा धोरण इत्यादी मध्ये एकवाक्यता असताना एक सुट्टी धोरण राबवून राज्यात प्रत्येक जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमध्ये अध्यापन दिवस/तास सारखे असावेत. अशी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ची मागणी आहे.

# ज्ञानमंदिर हायस्कुलचा दिमाखदार दशकपूर्ती सोहळा संपन्न




**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२३, घाटकोपर (मुंबई) :** घाटकोपर पूर्व, नालंदा नगर येथील सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट संचालित ज्ञानमंदिर हायस्कुलचा १०वा वर्धापन दिन चेंबूर येथील फाईन आर्टस् सोसायटी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या भव्य सोहळ्यास मल्लखांब विश्वगुरु आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित उदय देशपांडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष अनिल झोरे यांच्या शालेय शिक्षिका मेघना देव यांचीही प्रमुख अतिथी म्हणून विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे शाळेतील विद्यार्थ्यांचा १०० टक्के सहभाग. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र, गोवा, आसाम, केरळ अशा विविध राज्यांची पारंपरिक वेशभूषा साकारत त्या-त्या राज्यांची संस्कृती, लोकनृत्य आणि साहित्य यांचे प्रभावी सादरीकरण केले. संपूर्ण सभागृह भारताच्या सांस्कृतिक वैविध्याने नटले होते.इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी स्वावलंबन, निर्णयक्षमता, देशभक्ती, सेल्फ डिफेन्स,नृत्य, चित्रकला, फोनिक्स, क्रिटिकल थिंकिंग, डी.एम.एच. बँक तसेच 'माय स्कूल माय रिस्पॉन्सिबिलिटी' अशा विविध संकल्पनांवर आधारित प्रभावी सादरीकरण करत शाळेच्या पुढील ५० वर्षांच्या उज्ज्वल वाटचालीचे स्वप्न उभे केले. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण अभिनयाने उपस्थित मान्यवर, पालक आणि विद्यार्थी अक्षरशः भारावून गेले.

अपुरी जागा, झोपडपट्टी बहुल परिसर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षकांची उपलब्धता अशा अनेक अडचणींवर मागील १० वर्षांत यशस्वी मात करत शाळेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विद्यार्थ्यांचे कलागुण, शिक्षकांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हा सोहळा यशस्वी ठरल्याचे मत संस्थापक अध्यक्ष अनिल झोरे यांनी व्यक्त केले.

ज्ञानमंदिर हायस्कुलचा हा दशकपूर्ती सोहळा केवळ उत्सव नव्हता, तर गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि सर्वांगीण विकासाची ठाम व प्रेरणादायी घोषणा ठरली.

## ४५वी राष्ट्रीय मास्टर्स ॲथलेटिक्स स्पर्धेत मुंबईच्या बेस्ट कर्मचाऱ्याचे नेत्रदिपक यश



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२३, घाटकोपर (मुंबई) :** इंडिया मास्टर्स ॲथलेटिक्स फेडरेशनच्या वतीने दि.१३ ते १५ फेब्रुवारी २०२६ रोजी गव्हर्नमेंट इंजिनीरिंग कॉलेज, गोकालपूर, जबलपूर (मध्यप्रदेश) येथे ४५ वी नॅशनल मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत १५ राज्यातून ७०० स्पर्धक सहभागी झाले होते.

मुंबईच्या बेस्ट कर्मचारी खेळाडूनी या स्पर्धेत १३ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत मुंबईच्या खेळाडूंनी १९ सुवर्णपदक,१४ रौप्यपदक,१० कास्यपदक पटकावली आहे.

**पदक विजेते खेळाडू खालील प्रमाणे :-**

१) शिला शिरटावले-५ सुवर्ण
२) प्रतीक्षा शेलार-५ सुवर्ण
३) मनीषा गुणागी-१ सुवर्ण,१ रौप्य,१ कास्य
४) कल्पना भोसले-१ सुवर्ण,१ रौप्य,१ कास्य
५) भाग्यश्री पै -१ रौप्य
६) समाधान कोळी-२ सुवर्ण, १ रौप्य, १ कास्य
७) अमोल म्हात्रे-२ सुवर्ण,१ रौप्य
८) भूषण थोरात-१ सुवर्ण,३ रौप्य,१ कास्य
९) राजेश पवार-१ सुवर्ण, १ रौप्य,१ कास्य
१०) अमरशील पवार-१ सुवर्ण, १ रौप्य
११) विक्रम पोळ-२ रौप्य,३ कास्य
१२) जितेंद्र कोळी-१ रौप्य,१ कास्य
१३) प्रकाश धस-१ रौप्य,१ कास्य

पदकविजेत्या सर्व खेळाडूचे मैदानी खेळाचे मानद सचिव राजेश पवार व प्रशिक्षक अमरशील पवार यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

## चिंचोली प्राथमिक आरोग्य केंद्राचा राज्यस्तरीय सन्मान

### वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न, महाआरोग्य सन्मान २०२६ पुरस्काराने गौरव




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** ग्रामीण भागात प्रभावी आरोग्य सेवा राबवित उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या चिचोली (खापरखेडा) प्राथमिक आरोग्य केंद्राने राज्य पातळीवर मानाचा बहुमान पटकावला आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यावतीने देण्यात येणारा 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न' पुरस्कार तसेच 'महाआरोग्य सन्मान २०२६' प्रदान करून चिचोली प्रा.आ.केंद्राचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते चिंचोली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.जयश्री पेटकर यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुंबईचे उपमहापौर संजय घडी यांच्यासह आरोग्य विभागाचे सचिव डॉ.रवींद्रम, आयुक्त कादंबरी बलकवडे, संचालक डॉ.नितीन अंबाळेकर, सहसंचालक डॉ.विजय कंदेवाळ, डॉ.सुनिता गोलाईत, उपसंचालक डॉ.दीपचंद सोयान, डॉ.सुशील वाकचौरे व इतर मान्यवर प्रमुख उपस्थित होते. नागपूर जिल्ह्यातील ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून चिंचोली केंद्राची निवड झाल्याने नागपूर जिल्ह्यासाठी ही गौरवास्पद बाब मानली जात आहे. चिंचोली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात अनेक ग्रामीण व उपकेंद्रांचा समावेश असून नागरिकांना २४ तास वैद्यकीय सेवा देण्यावर भर दिला जातो. मातृ-बाल संगोपन, प्रसूती सेवा, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, संसर्गजन्य आजारांवरील नियंत्रण, कर्करोग तपासणी, सिकलसेल व कुष्ठरोग प्रतिबंध, अंधत्व निर्मूलन आदी विविध आरोग्य उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. तसेच आरोग्य कर्मचारी गावागावांत जाऊन जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना करत असल्याने ग्रामीण नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.कर्तव्यनिष्ठ सेवा, सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा यांची दखल घेत राज्यस्तरावर हा सन्मान मिळाल्याने आरोग्य विभागात समाधानाचे वातावरण आहे. स्थानिक नागरिकांनी ही चिंचोली आरोग्य केंद्राच्या संपूर्ण चमूवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेकपणा टाळावा - संदीप सूर्यवंशी




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२३, पाटण (सातारा) :** विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त परीक्षा, टेन्शन मुक्त परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाचे योग्य नियोजन करावे व पालकांनी परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची घ्यावयाची काळजी घेवुन मुलाना परीक्षेसाठी भयमुक्त करावे असे आव्हान प्राचार्य विनायक लटके यानी केले. उरुल (ता.पाटण) येथील जगदंबा हायस्कूल उरुल येथे एस.एस.सी विद्यार्थी शुभचिंतन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात श्री लटके बोलत होते अध्यक्ष ठक्कर बाप्पा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गांधी टेकडीचे प्राचार्य विनायक लटके सर प्रमुख पाहुणे संदीप सूर्यवंशीसर मुख्याध्यापक माध्यमिक निवासी आश्रम शाळा घोगाव संस्थेचे अध्यक्ष अनिलराव निकम उपाध्यक्ष लालासो नलवडे,सेक्रेटरी रमेश दाभाडे,सचिव संजय साळुंखे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संदीप सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा अतिरेक कसा टाळावा, अभ्यासाचे नेटके नियोजन कसे करावे, परीक्षा कालावधीत आहाराचे नियोजन कसे करावे, बोर्ड परीक्षेचा राजमार्ग या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी संचालक संभाजीराव देशमुखसर व मुख्याध्यापक राजेंद्र माने यांनी तानाजी निकम, माजी सेक्रेटरी निलेश फडतरे, सदस्य जयंत गायकवाड,अमिर मुलाणी बजरंग माने सुभाष देसाई आदी पदाधिकारी सह उरुल, ठोमसे, बोडकेवाडी येथील विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. प्रारंभी इयत्ता ५ वी ते दहावीत उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थांना रोख पारितोषिक देवुन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र माने यांनी केले तर वार्षिक पारितोषिक वाचन सरला घाडगे यानी केले सूत्रसंचालन सोपान लोहार व सविता पवार यांनी केले आभार रमेश पवार यांनी मानले.

# प्रांत कार्यालयावर २७ फेब्रुवारीला बालगंगा प्रकल्पग्रस्तांचा बेमुदत उपोषण

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२३, पेण :** बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कोरा झालेला जमिनीचा सात बारा परत मिळावा या मागणीसाठी शुक्रवार दि.२७ रोजी सकाळी ११.०० वा. उपविभागीय कार्यालय येथे बालगंगा प्रकल्प ग्रस्त बेमुदत उपोषण करून बाळगंगा जमीन हक्क सत्याग्रह करणार असल्याचे निवेदन नुकतेच प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांना दिले आहे.

पेण तालुक्यात गेली १७ वर्ष बालगंगा प्रकल्प प्रलंबित आहे गेली २०१० पासून बाळगंगा धरण प्रकल्पाचे काम सुरु झाले. या प्रकल्पामध्ये वाशिवली, वरसई, करोटी, गागोदे खुर्द, जावली, निधवली या सहा ग्रामपंचायतीसह ९ गावे आणि १३ आदिवासी वाड्या, सुमारे ३८०० हून अधिक कुटुंब बाधित झालेली आहेत. यामध्ये १२४० हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. जुना भूमी संपादन कायदा बदलून 'न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन, पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३' अस्तित्वात आला आहे. या कायद्यातील कलम १०१ नुसार संपादन केलेली जमीन पाच वर्षाच्या कालावधीत न वापरल्यास ती जमीन मुळ मालकाला किंवा त्यांच्या वारसांना परत देण्याची तरतूद आहे. बाळगंगा



प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची जमिन संपादित करून १६ वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे संपादित केलेल्या जमिनीचा सातबारा आपोआप कोरा झालेला आहे. तो कोरा झालेला सातबारा शेतकऱ्याला तो पुन्हा परत मिळावा या मागणीसाठी प्रकल्प ग्रस्त शेतकरी प्रात कार्यालयात समोर उपोषण करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी संदीप पाटील, भरत कदम, शरद जाधव , वासुदेव पाटील, अविनाश मोरे, प्रदीप गुरव, नितेश धारवे आदी प्रकल्प ग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी गुरुमंत्र अंगीकारावा -शिक्षणाधिकारी सुजाता खरे

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२३, मुंबई :** शालेय जीवनात आपल्याला यशस्वी व्हायचे असेल तर प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या गुरुने दिलेला कानमंत्र मनःपूर्वक ऐकावा आणि त्याचा अंगीकार करावा. असा मोलाचा सल्ला बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी सुजाता खरे यांनी विद्यार्थ्यांना दिला. त्या आज दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी जी/दक्षिण विभागातील केशवराव खाडे मार्ग मनपा शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या हिंद दि चादरया उपक्रमांतर्गत कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी त्यांच्या समवेत जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे याही उपस्थित होत्या.

पुढे बोलताना शिक्षण अधिकारी म्हणाल्या शिक्षकांचे मार्गदर्शन म्हणजे आपल्या जीवनाला मिळालेली एक दिशा असते.त्यांनी दिलेल्या दिशेने जर विद्यार्थी सरळ मार्गे चालला तर विद्यार्थी नक्कीच यशस्वी होऊ शकतो.

इंटरनेटच्या आणि मोबाईलच्या व आता अख च्या जमान्यामध्ये प्रत्येकाला प्रत्येकाकडे बघायला,कोणाला सांगायला, आणि कोणाचे ऐकायला वेळ शिल्लक राहिलेला नाही. परंतु शिक्षकच असा एक घटक आहे जो वेळ काढून इतरांना चांगले सांगतो, चांगले ऐकतो, आणि चांगले बोलतो सुद्धा. त्यामुळे शिक्षकांमध्ये एक सकारात्मक बदल घडवून आणणारी पिढी घडवण्याची ताकद असते. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेले धडे सकारात्मकतेने गिरवायला पाहिजेत. तरच तुम्ही यशस्वी जीवनाकडे वाटचाल करू शकाल.

गुरु तेग बहादूर सिंग यांनी त्यांच्या तरुण वयापासूनच परमार्थ व मानवता धर्म यांची जपणूक केली.आपल्या धर्माचे पालन केले. औरंगजेबाने जेव्हा त्याचा धर्म वाढवण्यासाठी इतर धर्मियांची गळचेपी करण्याचा प्रयत्न केला व धर्म परिवर्तन करण्यासाठी लोकांवर जुलमी अन्याय अत्याचार सुरू केले तेव्हा गुरु तेग बहादुर सिंग यांनी या जुलमी अन्याय अत्याचाराविरुद्ध बंड पुकारले आणि धमांतर नाकारले.त्यांनी धर्मांतर नाकारल्यामुळेच तत्कालीन जुलमी राजवटीने गुरु तेग बहादूर यांना ताब्यात घेऊन त्यांची सार्वजनिक ठिकाणी हत्या केली.त्यांनी एकवेळ मरण पत्कारले पण धर्म बदलला नाही. एवढी त्यांची आपल्या स्वधर्मा वर निष्ठा होती.



विद्यार्थ्यांनीही कसल्याही प्रकारच्या जुलमी व अन्यायी गोष्टीला बळी पडू नये.

तसेच कसल्याही प्रलोभनाला बळी न पडता शिक्षकांनी दिलेला जो मूलमंत्र आहे त्याची जोपासना करावी.आणि जीवनात यशस्वी व्हावे. शिक्षण घेत असताना कुठल्याही वाईट सवयी अथवा वाईट व्यसनांच्या आहारी जाऊ नये. आपले आरोग्य उत्तम प्रकारे जपावे. बाहेरील अथवा रस्त्यावरील उघड्यावरचे चमचमीत पदार्थ खाऊ नयेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशि.शिक्षक प्रशांत यगोलपवार यांनी केले. तत्पूर्वी मान्यवरांचे के के मार्ग शाळेच्या मुख्य प्रवेश द्वारावरच शारीरिक शिक्षण शिक्षक संजय माने यांनी बँड व लेझीमच्या सुंदर तालावर स्वागत केले.व त्यांना कार्यक्रम स्थळापर्यंत वाजतगाजत घेऊन गेले.

प्रथम गुरु तेगबहादूर सिंग यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले.प्रशि.शिक्षक संतोष कालकर यांनी विद्यार्थ्यांसह स्वागत गीताने कार्यक्रमाची छान सुरुवात केली.

नंतर गेल्या १३ फेब्रुवारी पासून आज पर्यंत जी /दक्षिण विभागातील वेगवेगळ्या शालेय इमारतीमध्ये हिंद दि चादर या उपक्रमांतर्गत विविध स्पर्धा व कार्यक्रम घेण्यात आले.विभागातील शाळांमध्ये राबविलेल्या उपक्रमांची चित्रफित प्रशि. शिक्षक महादेव कोळी यांनी छोट्या पडद्यावर विद्यार्थी व अधिकाऱ्यांना दाखवली.

हा संपूर्ण कार्यक्रम जी /दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली पार पडला.त्यांना विभाग निरीक्षक पूनम शिंदे यांनी मोलाची साथ दिली.

कार्यक्रमाला के के मार्ग शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शा.शि.शिक्षक प्रभाकर हजारे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनी केले.

# ठाणे महापालिकेच्या सभागृह नेतेपदी हणमंत जगदाळे यांची नियुक्ती

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२३, ठाणे :** महानगरपालिकेच्या सभागृह नेतेपदी ज्येष्ठ नगरसेवक हनमंत जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिकेतील अनुभवी नगरसेवक तसेच माजी.विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची ओळख असून, पक्ष संघटना व महापालिकेच्या कामकाजाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे.

या नियुक्तीमुळे ठाणे शहरातील विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शहरातील पायाभूत सुविधा, नागरिकांच्या मूलभूत समस्या तसेच प्रलंबित प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्यास ते प्राधान्य देतील, अशी



अपेक्षा व्यक्त होत आहे.

सभागृह नेतेपदी निवड झाल्याबद्दल आभार व्यक्त करताना हणमंत जगदाळे म्हणाले,

ठाणे महानगरपालिकेच्या सभागृह नेतेपदी माझी निवड करण्यात आल्याबद्दल मी सर्वांचा मनापासून आभारी आहे. प्रशासन आणि सभागृहाचे शिस्तबद्ध कामकाज यांचा समन्वय साधून ठाणे शहराच्या उन्नतीसाठी सदैव कार्यरत राहीन.

यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि उपमहापौर कृष्णा पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेकरांच्या अपेक्षा पूर्ण करत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमास ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, शिवसेनेचे राज्य सचिव व माजी. स्थायी समिती सभापती राम रेपाळे, माजी.उपमहापौर मुकेश मोकाशी, शिवसेना गटनेते पवन कदम, नवनिर्वाचित विरोधी पक्षनेते शानू पठाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# कुंडलवाडी येथे 'गंगाई पुरस्कार २०२६' प्रदान ; शारदा महिला मंडळाचा गौरव

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२३, कुंडलवाडी :** कै.गंगाधरराव पोतन्ना सब्बनवार प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'गंगाई पुरस्कार २०२६' यावर्षी कुंडलवाडी येथील शारदा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. लक्ष्मीबाई पंढरीसेठ दाचावार व सचिव सौ. वसुधा वसंत टोंगे यांना प्रदान करण्यात आला.

महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम स्वरूपात देण्यात आला. मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत हा सन्मान स्वीकारण्यात आला.

हा पुरस्कार सोहळा सब्बनवार प्रशाला येथे आयोजित वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पार पडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाट्य, वक्तृत्व आदी विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास कुंडलवाडी नगरपालिका अध्यक्षा प्रेरणा




गजानन कोटलावार, उपाध्यक्षा नेहा शैलेश -याकावार, प्रतिष्ठित व्यापारी साईनाथ गोविंदु उत्तरवार, माजी नगराध्यक्षा सुरेखा नरेंद्र जिठ्ठावार, राज्य पुरस्कारप्राप्त स्काऊट-गाईड शिक्षक तिप्पलवाड नागोराव, स.पो.नि. लता पगलवाड, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती कुसुमताई सब्बनवार, सचिव डॉ. प्रशांत सब्बनवार, मुख्याध्यापक कल्याण गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक नागनाथ चेटलुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी शारदा महिला मंडळाच्या कार्याचे कौतुक करत महिलांच्या सक्षमीकरणासाठी व समाजसेवेसाठी केलेल्या योगदानाची प्रशंसा केली. अशा संस्थांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

गंगाई पुरस्काराचे हे दुसरे वर्ष असून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. सन २०२५ मध्ये शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल राजेश्वर इरन्ना कनकमवार यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

कार्यक्रम उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, शिक्षक, स्वयंसेवक व सहकाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक कल्याण गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन रविकांत शिंदे व सारिका मद्दलवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन रविकांत शिंदे यांनी केले.

## थोडक्यात

### अजित पवार यांच्या विमान अपघात चौकशीसाठी लोणी भापकर गाव बंद

**अक्षराज : शरद भगत**

**दि.२३, बारामती :** संपुर्ण राज्याला दुख देणारी बातमी अजित पवार यांच्या विमान अपघाता तपासणीची मागणी रोहीत पवार हे वारंवार मागणी




करत आहेत. रोहीत पवार यांच्याकडे असलेले अनेक पुरावे प्रसार माध्यमांकडे देत असून याचेच पडसाद बारामती तालुक्यातील लोणी भापकर या गावाने बंद पुकारत अजित दादांचा घातपात असण्याची शक्यता असल्याची शंका या निमित्ताने वर्तवली आहे. अजित पवार यांच्या अपघाताला एक महीना होतं आला असून तपास शुन्य असल्याचे नागरिकांचे म्हणने असल्याचे दिसत आहे.

लोणी भापकर हे गाव दुष्काळी भागातील असल्याने अजित दादांनी या गावाला खुप प्रमाणात निधी दिला असल्याचे गावकरी सांगत आहेत.

आजच्या या गाव बंदला संपुर्ण व्यापारी वर्गाने व नागरिकांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला आहे. जर विमान अपघाताची चौकशी व्यवस्थित नाही झाली तर लवकरच रस्ता रोको अंदोलन देखिल करणार आहोत.

**- रविकाका भापकर**
**माजी सरपंच, लोणी भापकर**

### माथेरानमध्ये विकास प्रश्नावर मॉनिटरिंग कमिटी समोर आव्हान मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाची मागणी...

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२३, माथेरान :** माथेरानमध्ये ई-रिक्षा मंजुरीचा प्रश्न असो वा स्थानिक रस्त्यांची दुरवस्थाअनेक महत्त्वाचे विषय सध्या मॉनिटरिंग कमिटीच्या अखत्यारीत येत आहेत. पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र



असल्यामुळे प्रत्येक कामावर निर्बंध असणे स्वाभाविक आहे; मात्र वारंवार तक्रारी, वृत्तपत्रांतील बातम्या आणि नागरिकांचा आवाज उठूनही ठोस उपाययोजना होत नसल्याची भावना स्थानिकांमध्ये वाढत आहे.

रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले की काही विघ्नसंतोषी आक्षेप घेतात आणि काम थांबते, अशीही तक्रार पुढे येत आहे. परिणामी संपूर्ण गावाच्या विकासाला विलंब होत असून पर्यटननगरीची प्रतिमा बाधित होत आहे. रिक्षा प्रश्नातही टप्प्याटप्प्याने मंजुरी दिली जात असली, तरी स्पष्ट धोरण आणि वेळापत्रक नसल्याने संभ्रम वाढत आहे.

Supreme Court of India च्या निर्देशांनुसार मॉनिटरिंग कमिटीला मोठे अधिकार आहेत; त्यामुळे पर्यावरण आणि विकास यांचा समतोल राखत निर्णय घेणे ही त्यांची जबाबदारी आहे. तथापि, परिस्थिती चिघळत असल्यास राज्य शासनाच्या पातळीवरून समन्वय साधणे आवश्यक ठरते. म्हणूनच अनेकांकडून मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर हस्तक्षेप होऊन स्पष्ट दिशा द्यावी, अशी मागणी होत आहे. पर्यावरण रक्षणासोबत स्थानिक रोजगार, रस्ते व मूलभूत सुविधा यांनाही न्याय मिळेल असा ठोस, पारदर्शक निर्णय लवकरात लवकर होणे हीच काळाची गरज आहे.

### नेत्याच्या फोटोची विटंबना व शुद्धीकरण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, विटे (सांगली) :** विटे शहर व खानापूर तालुक्यातील शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी विरोधी पक्षनेते व खासदार राहुल गांधी यांच्या प्रतिमेची विटंबना केली होती. त्या घटनेचा निषेध



करून काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रतिमेला दुग्धाभिषेक करून शुद्धीकरण केले. बरीच वर्षे बंद असलेल्या काँग्रेस कमिटीजवळ हा कार्यक्रम झाला.

मुळात विटे शहरात हाताच्या बोटावर मोजण्याइतपत कार्यकर्ते काँग्रेस मध्ये शिल्लक राहिले आहेत. त्यांनी प्रतिमेची विटंबना पाहिली व त्यावर तीव्र प्रतिक्रिया आल्यावर शुद्धीकरण देखील केले. नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते शिंदे शिवसेना गटाला जावून मिळाले होते. त्यांनीच आता न घाबरता शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा निषेध केला. पाहणारे व निषेध करणारे अशी दुहेरी भूमिका त्यांनी पार पाडली. सकाळी विटे दुपारी उपराटे याचे प्रत्यंतर विटे शहरातील जनतेला पुन्हा एकदा आले. काँग्रेसने आता विट्यात शिवसेना शिंदे गटाच्या विरोधात अशीच भूमिका वेळोवेळी घ्यावी अशी शहरात चर्चा होती. विट्यातील सर्वच कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी आता आपण नेमके कोणत्या पक्षात आहोत हे जाहीर करावे व त्याच पक्षाचे काम मनापासून करावे अशी प्रतिक्रिया येथे व्यक्त होताना दिसत आहे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आता इतर ठिकाणी ण बसता काँग्रेस समितीत बसावे. पक्षाला पुन्हा उर्जीतावस्था प्राप्त करून ध्यावी अशी मागणी होत आहे.

### चिखला, भिगवनच्या भगिनींना न्याय देत दोषींवर कडक कारवाई करा

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२३, पालम (परभणी) :** बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील चिखला या गावामध्ये संजीवनी वाघ व इतर महिलांना कपडे पहाटेपर्यंत मारहाण



करण्यात आली. तसेच भिगवन येथील हिंदू तरुणीचे अपहरण करण्यात आले आहे या दोन्ही घटनेतील दोषींना कडक कारवाई करून त्यांना लवकरात लवकर शासन करण्यात यावे, या मागणीचे निवेदन आज दि.२३ फेब्रुवारी रोजी पालम तहसीलदारांना देण्यात आले. सदरील निवेदनावर विलास चव्हाण, मधुकर रोकडे, भगवान शिरसकर, गजानन देशमुख, नरसिंग रोकडे, मंगेश घोरपडे, राहुल गायकवाड, आनंद साकला, गुणवंत सराफ, राम कदम, अच्युत पाथरकर, राजकुमार गोडसे, रामजी गावंडे, श्रीराम पाटील, अतुल धुळगंडे यांच्यासह अनेक नागरिकांच्या सह्या आहेत.